**नियमित दिवाणी मुकदमा क्रमांक १७४/२०२०**
**मधील निशाण २९० वरील आदेश**

१. अर्ज व म्हणणे वाचले.

२. अभिलेखातील कागदपत्रे पाहिली.

३. उभयपक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

४. वादी यांचे अर्जातील कथनांप्रमाणे प्रतिवादी क्र.२० हे दि.१५/०९/२०२० रोजी मयत झाले आहेत. परंतु, ते उद्योगधंद्यानिमित्त परराज्यात वास्तव्यास असल्याने तसेच दरम्यानचे काळात कोरोना महामारीमुळे संपूर्ण देशात लॉकडाऊन असल्यामुळे वादी यांना प्रतिवादी क्र.२० यांचे वारस विहीत मुदतीत अभिलेखावर घेता आले नाहीत. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२० यांचेबाबत तांत्रिकदृष्टया दावा अबेट झाला आहे. वादी यांनी ही कथने अर्जाचे पृष्ठयर्थ ॲफिडेव्हीट सादर करुन शपथेवर केली आहेत. प्रतिवादी क्र.२० हे लॉकडाऊनचे काळात मयत झाल्याचे दिसून येते. त्यामुळे, वादी यांनी दिलेले कारण संयुक्तिक वाटते. वादी यांनी दावा मिळकतीचे सरस-निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी हा दावा दाखल केला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.२० यांचे वारसांबाबत दाव्याचे कारण पुढे चालू राहते. सबब, या कामी प्रतिवादी क्र.२०यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक व जरुरीचे आहे. त्याकरीता प्रतिवादी क्र.२० यांचेबाबत तांत्रिकदृष्टया झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक व जरुरीचे आहे. सबब, मी खालील आदेश पारित करीत आहे.

**आ दे श**

१. वादी यांचा निशाण २९० वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र.२० यांचे वारस मुदतीत अभिलेखावर न घेतल्यामुळे प्रतिवादी क्र.२० यांचेबाबत तांत्रिकदृष्टया झालेला दावा अबेटमेंटचा आदेश रद्द करणेत येत आहे.

-

Digitally signed by Dhiraj Maruti Hinglajkar
Date: 2021.03.26 15:06:45 +0530

**दिनांक २०.०३.२०२१** **(डी.एम.हिंग्लजकर)**

**ठिकाणः विटा.** **३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,**

**ता. खानापूर, जि.सांगली.**

Case No : RCS. No. 174 of 2020
I affirm that the contents of this pdf file Order are same words as per original Order,
Name of the Stenographer:V.A.Mane
Court Name: 3rd Joint Civil & Criminal Court, Vita, Dist.Sangli.
Date of decision : 20.03.2021
Order signed by P.O.on : 20.03.2021
Order uploaded on : 22.03.2021